# पुणे प्राईम न्यूज

जनमानसाचा निडर आवाज...

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २४४ | सोमवार, ३० मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210







## संक्षिप्त

### रशिया करणार जगाची तेलकोंडी

नवी दिल्ली, ता. २९ : इराण-अमेरिका यांच्यातील युद्धानं जगावर तेल संकट गडद झालं असताना आता रशियानं मोठं पाऊल उचललंय. रशियानं आपल्या देशात इंधनाचा तुटवडा उद्भवू नये म्हणून जगाला इंधन पुरवठा करणं थांबवणार आहे. इंधन उत्पादन क्षेत्रातील प्रमुख देशांपैकी एक रशिया आहे. देशांतर्गत इंधनाच्या किमती स्थिर करण्यासाठी रशियन सरकारनं मोठी पावले उचलली आहेत. इराण-अमेरिका युद्धामुळे इंधनाच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणात चढ-उतार दिसत आहेत. रशियानं १ एप्रिलपासून पेट्रोलच्या निर्यातीवर बंदी घालण्याचा प्रस्ताव आणलाय. ही बंदी केवळ काही आठवड्यांसाठी नाही तर तब्बल चार महिने, म्हणजेच ३१ जुलैपर्यंत लागू राहण्याची शक्यता आहे. रशियाच्या निर्णयामुळे चीन, तुर्की, ब्राझील, आफ्रिका आणि सिंगापूर यांसारख्या थेट पेट्रोल आयात करणाऱ्या देशांच्या ऊर्जा बाजारात मोठा व्यत्यय येण्याची शक्यता वर्तवण्यात येतीय. तसेच ट्रम्पनंतर पुतीन यांनी रशिया फर्स्टचा पवित्रा अवलंबिला असल्याचं दिसतंय.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाच्या चर्चांना पुन्हा उधाण

## सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली एकत्र येण्याची शक्यता; पक्षांतर्गत हालचाली वाढल्या

**पुणे, ता. २९ :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाची चर्चा सुरू झाली होती. त्या वेळी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दोन्ही बाजूंना एकत्र आणण्याचा प्रयत्न केल्याचे बोलले जात होते. मात्र, त्यानंतर त्यांच्या आकस्मिक निधनामुळे ही प्रक्रिया थांबली आणि चर्चा अपूर्णच राहिली. पुढे कोणत्याही गटाने ठोस पाऊल न उचलल्यामुळे हा विषय हळूहळू मागे पडला होता.

आता पुन्हा एकदा या चर्चेला चालना मिळताना दिसत आहे. अजित पवार यांचे निकटवर्तीय मानले जाणारे आमदार सुनील शेळके यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गट एकत्र येऊ शकतात, असा विश्वास व्यक्त केला आहे. अजूनही वेळ गेलेली नाही आणि योग्य निर्णय घेतला तर पक्षासाठी हे फायदेशीर ठरेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी पक्षाची जबाबदारी स्वीकारली आहे. त्यांनी राज्यातील पक्षाचे नेतृत्व हाती घेतले असले तरी सध्या काही अडचणींचा सामना करावा लागत आहे. पक्षातील काही नेत्यांभोवती निर्माण झालेल्या वादांमुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाली आहे. रुपाली चाकणकर आणि नरहरी झिरवाळ या नेत्यांबाबत सुरू असलेल्या वादामुळे पक्षातील वातावरण ढवळून निघाले आहे.

या पार्श्वभूमीवर पक्षाची सध्याची स्थिती काय आहे आणि पुढे काय होणार, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये पुन्हा एकत्र येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आगामी काळात या विषयावर काही ठोस निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

याबाबत बोलताना आमदार सुनील शेळके यांनी स्पष्ट भूमिका मांडली. त्यांनी सांगितले की, जर



सुनेत्रा पवार यांचे नेतृत्व सर्वांना मान्य झाले आणि दोन्ही गट एकत्र आले, तर त्याचा आम्हाला अभिमानच वाटेल. पक्ष मजबूत होणे ही सर्वांचीच जबाबदारी आहे आणि त्यासाठी सर्वांनी सकारात्मक विचार करणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

तसेच, ज्यांना सुनेत्रा पवार यांचे नेतृत्व मान्य नसेल, ते इतर पक्षात जाऊ शकतात, असेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र, बहुसंख्य नेते एकत्र येऊन पक्ष बळकट करण्याचा निर्णय घेत असतील, तर त्याचे स्वागतच केले जाईल, असेही त्यांनी म्हटले.


अजित पवार यांच्या अनुपस्थितीची जाणीव सध्या काम करताना होत असल्याचेही शेळके यांनी नमूद केले. त्यांच्या जाण्यानंतर पक्षात एक पोकळी निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांच्या उत्तराधिकारी म्हणून सुनेत्रा पवार यांना अधिक जबाबदारी देण्याची गरज असल्याचे मत काही वरिष्ठ नेत्यांनी व्यक्त केले आहे. सुनेत्रा पवार यांना पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी दिली गेली, तर त्यांना योग्य सन्मान मिळेल, असेही मत पुढे येत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही गट एकत्र येऊ शकतात आणि पक्षाला नवी दिशा मिळू शकते, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एकंदर पाहता, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पुन्हा एकदा एकत्रीकरणाची चर्चा सुरू झाली असून, येत्या काळात याबाबत काय निर्णय घेतला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### राजकारणात लवकरच मोठा भूकंप होणार

**मुंबई, ता. २९ :** राज्यात नुकतेच उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपल्या नेत्यांना भावनिक आवाहन करत त्यांचे पक्ष सोडण्याच्या निर्णयाचे मत परावर्तित केले होते, त्यामुळे राज्यात एकनाथ शिंदेंचं ऑपरेशन टायगर उधळून लावल्याची चर्चा आहे, तर दुसरीकडं ठाकरे गटावरील फोडाफोडीचं संकट अजून टळलं नाहीये, त्याचे कारणं असं की, शिंदे गटाच्या खासदार ज्योती वाघमारे यांनी ऑपरेशन टायगर होणारच असं विधान केलंय.

ऑपरेशन टायगर किंवा ऑपरेशन तुतारी होणार, जे पण होणार योग्य वेळी होणार असल्याच विधान करत ज्योति वाघमारे यांनी उद्धव ठाकरेंची चिंता पुन्हा वाढवलीय. अलीकडच्या काळात राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडी पाहायला मिळाल्या. भाजपचं लोटस ऑपरेशन असो किंवा राष्ट्रवादी पक्षातील विभाजन, यावरून राज्याच लक्ष वेधल्या गेलं होतं.




## आरबीआयचा बँकांना दणका

**मुंबई, ता. २९ :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं वेगवेगळ्या नियमांचं आणि मार्गदर्शक सूचनांचं पालन न केल्यानं तीन सार्वजनिक बँकांवर कारवाई केली आहे. या तीन बँकांना मिळून २ कोटी १७ लाख ५० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आलाय. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं यूनियन बँक ऑफ इंडियावर ९५.४० लाख रुपये, बँक ऑफ इंडियावर ६३.६० लाख रुपये आणि बँक ऑफ इंडियावर ५८.५० लाख रुपयांचा दंड ठोठवला आहे.

याशिवाय ि नटेक कँमनी पाइन लॅब्सवर देखील तीन लाख १० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आलाय. दरम्यान, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या प्रसिद्धीपत्रकानुसार यूनियन बँक ऑफ इंडियावर फसवणुकीच्या रिपोर्टिंगची योग्य व्यवस्था न केल्यानं आणि इतर कारणांसाठी दंड लावलाय. तरआरबीआयनं बँक ऑफ इंडियावर प्राथमिक क्षेत्राला कर्ज देण्यासंदर्भात आणि व्याज जमा करण्यासंदर्भातील नियमांचं उल्लंघन केल्याचा आरोप केलाय. तसेच सेट्रल बँक ऑफ इंडियावर केवायसी आणि बचत बँक खात्यासंदर्भातील नियमाचं उल्लंघन केलं म्हून ६३.६० लाख रुपयांचा दंड करण्यात आलाय.

## अभिनेता विजय तामिळनाडूमध्ये दोन जागांवर निवडणूक लढवणार

**पुणे, ता. २९ :** अभिनेता आणि टीव्हीके प्रमुख विजय तामिळनाडूमध्ये दोन जागांवर निवडणूक लढवणार असून, उमेदवारांची नावे जाहीर करून तरुणांना एक मोठे आश्वासन दिले आहे. विजय स्वतः त्रिची पूर्व आणि पेरांबूर (चेन्नई) या दोन जागांवरून निवडणूक लढवणार आहेत. विजय यांनी असेही म्हटले आहे की, ते स्वतः सर्वत्र प्रचार करू शकणार नाहीत. त्यामुळे, त्यांनी अशा उमेदवारांची निवड केली आहे ज्यांच्यावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे आणि जे पक्षाचे काम प्रभावीपणे पुढे नेऊ शकतील. विजय यांनी हेही स्पष्ट केले की, निवडणुकीत त्यांचे नाव सी जोसेफ विजय असे वापरले जाईल. विजय यांनी आपली तयारी आधीच दाखवून दिली आहे आणि आपल्या टीमसह निवडणुकीच्या रिंगणात



उतरण्याचा आपला इरादा जाहीर केला आहे.

तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात निवडणुका होणार आहेत. निकाल ४ मे रोजी जाहीर होतील. तामिळनाडूमध्ये एकूण २३४ विधानसभा जागा आहेत. तामिळनाडूमध्ये अंदाजे ५.६ कोटी मतदार आहेत, ज्यात अंदाजे २.७ कोटी पुरुष आणि २.८ कोटी महिला मतदारांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, ७ हजार ६१७ तृतीयपंथी मतदार या निवडणुकीत सहभागी होतील. तामिळनाडूचे राजकारण दीर्घकाळापासून दोन प्रमुख पक्षांभोवती फिरत आहे: एआयएडीएमके आणि डीएमके. या दोन पक्षांचे राज्याच्या राजकारणावर दीर्घकाळ वर्चस्व राहिले आहे आणि बहुतेक निवडणुका त्यांच्यातच लढल्या जातात.

विजयचे पूर्ण नाव जोसेफ विजय चंद्रशेखर आहे. तो तमिळ चित्रपटसृष्टीतील एक मोठा सुपरस्टार असून, त्याला प्रेमाने थलपथी विजय म्हणून ओळखले जाते. त्याने अनेक यशस्वी चित्रपट दिले आहेत आणि त्याची लोकप्रियता केवळ चित्रपटांपुरती मर्यादित नाही; लोक त्याला एक खंबीर आणि प्रभावशाली व्यक्ती म्हणूनही पाहतात. विजयने स्वतःचा राजकीय पक्ष, तमिळगा वेत्री कळघम स्थापन केला आहे, जो २०२४ मध्ये सुरू झाला. विजयने राजकारणात पूर्णपणे सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा चाहता वर्ग प्रचंड मोठा आहे, जी त्याची सर्वात मोठी ताकद मानली जाते.



## राज्यभरात पुन्हा पाऊस अन् गारपीटीचे संकट

पुणे, ता. २९ : राज्यात पुन्हा एकदा अवकाळी पावसाचं संकट घोंगावणार असल्याची शक्यता आहे. ३० मार्चपासून राज्यात ढगाळ हवामान आणि दुपारनंतर होणाऱ्या वादळी पावसाचे नवीन सत्र सुरू होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ३० मार्च रोजी प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता आहे. तर उर्वरित विदर्भात देखील काही प्रमाणात हवामानात बदल दिसून येऊ शकतो, असा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवलाय.

दरम्यान, ३० मार्चच्या तुलनेत ३१ मार्च रोजी एकंदरीत वादळी पावसाच प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे. मात्र, या भागांमध्ये काही प्रमाणात अस्थिर हवामान आणि वादळी पाऊस पडू शकतो. त्यानंतर १ ते ४ एप्रिल दरम्यान वादळी पावसाचं प्रमाण वाढण्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळं या कालावधीत मध्य महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भातील ठिकठिकाणी आभाळी हवामान, दुपारनंतरचा वादळी पाऊस, आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## शेतकऱ्यांनी ३१ मार्चपूर्वी परतफेड केल्यास एक रुपयाही व्याज भरण्याची गरज नाही

**पुणे, ता. २९ :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारी महत्त्वाची माहिती समोर आली आहे. खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये घेतलेल्या पीक कर्जाची ३१ मार्चपूर्वी परतफेड केल्यास शून्य टक्के व्याजदराचा लाभ मिळणार आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मार्फत देण्यात आलेल्या कर्जाची वेळेत परतफेड करण्याचे आवाहन बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे यांनी केले आहे.

यंदाच्या खरीप हंगामासाठी बँकेला २०६४ कोटी रुपयांचे कर्जवाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले होते. मात्र, बँकेने हे उद्दिष्ट ओलांडत सुमारे २४९० कोटी रुपयांचे कर्जवाटप पूर्ण केले आहे, जे सुमारे १२० टक्के आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळाला आहे.



३१ मार्च २०२६ पर्यंत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या किसान क्रेडिट कार्ड योजनेअंतर्गत शून्य टक्के व्याजदराचा लाभ मिळणार आहे. तसेच राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजना २०२६ अंतर्गत जाहीर प्रोत्साहनपर योजनेत ५० हजार रुपयांपर्यंत लाभ मिळविण्याची संधीही उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी मुदतीपूर्वी कर्जफेड करून या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, जिल्ह्यात राष्ट्रीयीकृत बँका, खासगी व व्यापारी बँका, ग्रामीण बँका आणि पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्यामार्फत पीक कर्जवाटप केले जाते. गतवर्षी २०२४-२५ हंगामासाठी सुमारे ६३७० कोटी रुपयांचे कर्जवाटपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते, ज्यामध्ये सुमारे ५० टक्के वाटा हा जिल्हा बँकेचा होता.

## हडपसर येथील शिंदे वस्तीतील फुटलेला कालवा पाटबंधारे विभागाकडून दुरुस्त

### उन्हाळी आवर्तन पुन्हा सुरू; अडीच लाख हेक्टर शेतीला मिळणार पाणी

**पुणे, ता. २९ :** हडपसर येथील शिंदे वस्ती परिसरात फुटलेल्या कालव्याची दुरुस्ती पाटबंधारे विभागाने वेगाने पूर्ण केली असून, रविवार (ता. २९) सकाळी ६ वाजल्यापासून खडकवासला धरणातून उन्हाळी आवर्तन पुन्हा सुरू करण्यात आले आहे, अशी माहिती उपविभागीय अभियंता किरण देशमुख यांनी दिली.

या आवर्तनामुळे हवेली, दौंड, इंदापूर आणि बारामती तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांना मोठा दिलासा मिळणार असून पाणीटंचाईचे संकट कमी होण्यास मदत होणार आहे. रविवारी सकाळी ६ वाजता



४०० क्युसेक वेगाने कालव्यात पाणी सोडण्यात आले. त्यानंतर परिस्थितीचा आढावा घेऊन हा विसर्ग टप्प्याटप्प्याने वाढवण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी कालवा फुटला होता, त्या ठिकाणी खबरदारी म्हणून काही दिवस पाटबंधारे विभागाचे कर्मचारी २४ तास देखरेख ठेवणार आहेत. तसेच, कोणतीही आपत्कालीन स्थिती उद्भवल्यास आवश्यक यंत्रसामग्री तैनात ठेवण्यात आली आहे.

गेल्या सोमवारी (ता. २३) सकाळी ८ वाजता हडपसर येथील शिंदे वस्ती येथे अचानक कालवा फुटल्याने मोठ्या प्रमाणात पाणी वाया गेले होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पाटबंधारे विभागाने तातडीने पावले उचलली आणि त्याच दिवशी दुपारी १ वाजेपर्यंत तात्पुरती दुरुस्ती करून पाण्याचा प्रवाह थांबवला. २४ मार्चपासून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शास्त्रोक्त पद्धतीने दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले होते. कर्मचाऱ्यांच्या अहोरात्र मेहनतीमुळे कालवा आता पूर्ण क्षमतेने पाणी वहनासाठी तयार झाला आहे.

खडकवासला धरणातून सोडण्यात येणाऱ्या या आवर्तनामुळे पुणे जिल्ह्यातील शेतीला मोठा आधार मिळणार आहे. हवेली, दौंड, बारामती आणि इंदापूर तालुक्यातील अडीच लाख हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा फायदा होणार आहे. तसेच, ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचे स्रोतही यामुळे भरले जाणार आहेत.

दरम्यान, वाढत्या उष्णतेमुळे पिके करपू लागली असताना हे आवर्तन सुरू झाल्याने शेतकरी आणि नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. रब्बी हंगामात सुमारे पावणेचार टीएमसी पाणी सोडण्यात आले होते. त्याचप्रमाणे या आवर्तनाचेही नियोजन योग्य पद्धतीने करण्यात आले असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

## संक्षिप्त

### राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदासाठी ५ नावं चर्चेत



**पुणे, ता. २९ :** अशोक खरात प्रकरण रुपाली चाकणकर यांना चांगलेच भोवलंय,कारण त्यांना या प्रकरणी महिला आयोगाच्या पदाच्या राजीनाम्यानंतर आता राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. दरम्यान, आता त्यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या पदावर कोणाची वर्णी लागणार याकडं सर्वांचे लक्ष लागले आहे. हे महत्वाचे पद असल्यामुळे अनेक महिला नेत्यांनी हे पद मिळावं यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यातच यासाठी सध्या ५ नावांची जोरदार चर्चा सध्या सुरु आहे. राष्ट्रवादी काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्षपदाच्या शर्यतीत सना मलिक, सरोज अहिरे, वैशाली नागवाडे, राजलक्ष्मी भोसले आणि प्रतिभा शिंदे यांची नावं आघाडीवर आहेत. या ५ महिला नेत्यापैकी एकाची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती केली जाईल. यापैकी कुणाला संधी द्यायची हे मोठं आव्हान सुनेत्रा पवार यांच्यापुढे आहे.

### पुण्यातील एफसी रोडवरच तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**पुणे, ता. २९ :** पुण्यातील गजबजलेल्या एफसी रोड परिसरात शनिवारी रात्री घडलेल्या एका धक्कादायक घटनेने नागरिकांना हादरवून सोडले. खाऊगल्लीमध्ये सुमारे ९.१५ वाजण्याच्या सुमारास, नेहमीप्रमाणे गर्दी असताना आदित्य सातपुते (वय ४१) यांनी स्वतःच्या गळ्यावर ब्लेडने वार करत आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार इतक्या अचानक घडला की उपस्थित लोक काही क्षणांसाठी स्तब्ध झाले. मिळालेल्या माहितीनुसार, आदित्य सातपुते हे मूळचे मुंबईतील बोरिवलीचे रहिवासी असून सध्या पुण्यातील भोसले नगरमध्ये राहत होते. काही दिवसांपूर्वी त्यांची नोकरी गेल्याने ते मानसिक तणावाखाली होते. याच नैराश्यातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.घटना घडताच नागरिकांनी तत्परता दाखवत तातडीने मदत केली. जखमी अवस्थेत असलेल्या सातपुते यांना जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांकडून मिळत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेतली. प्राथमिक तपासात नोकरी गमावल्यामुळे आलेल्या मानसिक तणावातून हा प्रकार घडल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, यामागे इतर काही कारणे आहेत का, याचाही तपास सुरू आहे.

### सोरतापवाडी येथे विहरीत बुडून तरुणाचा मृत्यू

**उरुळी कांचन, ता. २९ :** पोहण्यासाठी गेलेला सुमारे १९ ते २० वर्षे वयोगटातील एक तरुण मुलगा विहरीत बुडाला असल्याची माहिती मिळत आहे. सोरतापवाडी (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील गुंजाळ मळा परिसरात ही घटना घडली आहे. आज रविवारी (ता. २९) दुपारी अडीच ते पाऊणे तीन वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली आहे. या घटनेमुळे सोरतापवाडी आणि उरुळी कांचन परिसरात मोठी खळबळ उडाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.बुडालेल्या तरुण मुलाचे नाव अद्याप माहिती नसून घटनास्थळी उरुळी कांचन पोलीस दाखल झाले आहेत. दरम्यान, सोबत असलेल्या मित्रांनी आरडाओरडा केल्यानंतर परिसरातील नागरिक मदतीसाठी धावून आले. घटनेची माहिती मिळताच उरुळी कांचन पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

### संत ज्ञानेश्वर महाराज पालखी ८ जुलैला प्रस्थान, २४ जुलैला पंढरपूर आगमन

**आळंदी, ता. २९ :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचा आषाढी वारी पालखी सोहळा यंदा ८ जुलै रोजी दुपारी तीन वाजता आळंदीहून पंढरपूरकडे प्रस्थान करणार असून २४ जुलै रोजी पंढरपूर येथे आगमन होणार आहे. आषाढी एकादशी २५ जुलै रोजी साजरी होणार असल्याची माहिती पालखी सोहळाप्रमुख ॲड. राजेंद्र उमाप यांनी दिली. या वर्षी १७ दिवसांच्या वारीत ४ गोल व ३ उभे रिंगण होणार आहेत.यासंदर्भात संत ज्ञानेश्वर महाराज मठात आळंदी संस्थानची बैठक पार पडली. बैठकीला संस्थानचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, विश्वस्त योगी निरंजननाथ, चैतन्य महाराज कबीर, ड.रोहीणी पवार, दिंडी समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते. चैत्र दशमीपासून वारीच्या नियोजनाची परंपरा असून त्यानुसार प्रस्थान, मुक्काम व अन्य बाबींचा आढावा घेण्यात आला.

### गतविजेत्या बंगळुरूने फोडला विजयाचा नारळ

**मुंबई, ता. २९ :** आयपीएल २०२६ हंगामाची सुरुवात अतिशय धमाकेदार झाली. काल झालेल्या पहिल्याच सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने सनरायझर्स हैदराबादवर शानदार विजय मिळवला. बंगळुरूम धील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात आरसीबीने ६ विकेट्स राखून सहज विजय मिळवत हंगामाची विजयी सुरुवात केली. या विजयासह त्यांनी पॉइंट्स टेबलमध्ये आपलं खात उघडत २ गुणांची कमाई केली. या विजयामुळ गतविजेत्या आरसीबीनं पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली असून, यंदाच्या हंगामात ते पुन्हा विजेतेपदासाठी सज्ज असल्याचे संकेत दिलेत. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादने २०२ धावांचे लक्ष्य ठेवले, जे आरसीबीने १६ व्या षटकात पूर्ण केले आणि ६ गडी राखून सामना जिंकला.

# दीपक केसरकर हेच एकनाथ शिंदे यांना अशोक खरातकडे घेऊन गेले; संजय राऊत यांचा घणाघात

**मुंबई, ता. २९ :** दीपक केसरकर शिक्षण मंत्री असताना अशोक खरात बदल्या, बढत्या आणि टेंडर ठरवायचा असा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी केला. तसेच दीपक केसरकर एकनाथ शिंदे यांना अशोक खरातकडे घेऊन गेले असेही संजय राऊत म्हणाले.

मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत संजय राऊत म्हणाले की, अशोक खरात प्रकरणी सरकारने उत्तर दिलं पाहिजे. कारण खरात सरकारी माणूस आहे. ज्याच्या पाठीशी ४० आमदार आहे, खासदार आहे आणि महिला आयोग आहे. अगदी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री आहेत. अशा महान महात्म्यावरती आम्ही काय उत्तर देणार?

तसेच सरकार जर अशोक खराच्या मागे नसतं तर हे ४० आमदार, खासदार, मंत्री जे तिथे सेवा करायला जात होते त्यांची यादी सरकारने जाहीर केली असती. भोंदू बाबापेक्षा भोंदू बाबाला प्रतिष्ठा देणारे राज्यकर्ते आणि राजकारणी अधिक गुन्हेगार असतात. भोंदू बाबा तर आहेच पण त्या भोंदू बाबाच्या चरणाशी जाऊन सेवा करणारे, विधी करणाऱ्या राज्यकर्त्यांना अधिक अपराधी मानायला पाहिजे. त्यामुळे अशा सगळ्यांची यादी जाहीर व्हायला पाहिजे.

तुम्ही इतर गुन्ह्यांमध्ये सहआरोपींची नाव देता, त्यांना अटक करता, त्यांना चौकशीला बोलवता. इथे दीपक केसरकर, सुनील तटकरे, रुपाली चाकणकर,



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राधाकृष्ण विखे पाटील यांना चौकशीसाठी बोलावलं का? यांना विचारा की तिथे का गेला होतात? तुम्ही कोणते विधी केलेत, त्यातून तुम्हाला काय फायदा झाला, तुम्ही त्यांना किती पैसे दिलेत, पैसे कुठून आणलेत? पोलिसांना जर प्रश्न विचारण्यात अडचण असेल तर मी त्यांना प्रश्नावली तयार करून देतो. प्रश्न विचारला पाहिजे की केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यापर्यंत अशोक खरातला कोण घेऊन गेलं? चंद्रकांत पाटील यांच्यापर्यंत अशोक खरात कसा पोहोचला? फोटो कोणीही कोणाबरोबर काढू शकतो असं मुख्यमंत्री म्हणतात. मी मुख्यमंत्र्यांच्या मताशी पूर्ण सहमत आहे. तरीही माझा प्रश्न आहे की, अशोक खरात सारखा भोंदू बाबा राज्याच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत कसा पोहोचला? कोणीतरी मध्यस्थ आहे.

कोणीतरी दलाल आहे जे या सरकारमध्ये सत्तेमध्ये भोंदू बाबाला प्रतिष्ठा देत होते. अशोक खरात मंत्रालयामध्ये कसा पोहोचतो? अशोक खरात अनेक मंत्र्यांच्या कामात कसा हस्तक्षेप करू शकत होता? याबाबत आम्हाला माहिती द्या. हा तपास आता फक्त एका व्यक्तीपुरता मर्यादित नसून महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेशी संदर्भात आहे असे संजय राऊत म्हणाले.

दीपक केसरकरांचा अशोक खरातशी जो संबंध आहे, तो जग जाहीर आहे आणि याबद्दल मीच बोलतोय का? असे संजय राऊत म्हणाले याबाबत अख्खं जग बोलतंय. केसरकर आणि खरात यांचे व्हिडिओ आणि फोटो आहेत. ते स्वतःच कबूल करतायत की हो खरातचे आणि माझे घरचे संबंध होते म्हणून. खरातचं भविष्य खरं ठरत होतं हे स्वतः केसरकर सांगत होते.केसरकरांवर त्या भोंदू बाबाने काहीतरी जादू टोणा केलेला दिसतोय असा टोलाही संजय राऊत यांनी लगावला. सावंतवाडीत मोती तलावर खूप डोमकावळे फडफडतात, केसरकर त्यातलेच तो एक डोम कावळा आहे. केसरकरांविरुद्ध पुरावे आहेत, केसरकर त्या अशोक खरातचे सगळ्यात मोठे हस्तक होते, हे सगळ्यांना माहिती आहे. अनेक मंत्र्यांना आमदारांना केसरकर त्याच्याकडे घेऊन गेलेत. एकनाथ शिंदे यांना अशोक खरातकडे घेऊन जाणारे हेच दीपक केसरकर आहेत असेही संजय राऊत म्हणाले.

## कोयता व स्प्लेंडरसह तीन अल्पवयीन मुले पोलिसांच्या ताब्यात

**लोणी काळभोर, ता. २९ :** फुरसुंगी पोलीस ठाण्याच्या पथकाने रात्रगस्ती दरम्यान संशयास्पद हालचाली करणाऱ्या तीन अल्पवयीन मुलांना धारदार कोयता व स्प्लेंडर दुचाकीसह ताब्यातघेतले आहे . ही कारवाई उरुळी देवाची (ता. हवेली) येथील ढोलेवस्ती रोड परिसरात असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ शुक्रवारी (ता.२७ मार्च) पहाटे सुमारे पावणे एक वाजण्याच्या सुमारास केली आहे. या कारवाईमुळे परिसरात संभाव्य गंभीर गुन्हा घडण्यापूर्वीच पोलिसांनी तो उधळून लावल्याने स्थानिक नागरिकांकडून पोलिसांच्या सतर्कतेचे कौतुक व्यक्त करण्यात येत आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ मार्चच्या रात्री फुरसुंगी पोलीस ठाण्याचे पथक गुन्हे प्रतिबंधात्मक गस्तीसाठी बाहेर पडले होते. उरुळी गावात गस्त घालत असताना, पोलीस हवालदार नितीन गायकवाड यांना तीन युवक संशयास्पदरीत्या दुचाकीसह उभे असल्याची व त्यांच्या जवळ धारदार शस्त्र असल्याची माहिती एका खबऱ्या मार्फत मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ वरिष्ठांना माहिती देत सापळा रचला. पोलीस उपनिरीक्षक विष्णू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पंचांना सोबत घेऊन पथकाने घटनास्थळी धाड टाकली. पोलिसांची चाहूल लागताच तिघांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला; मात्र पोलिसांनी तत्परतेने पाठलाग करून त्यांना जागीच पकडले. ताब्यात घेतलेल्या मुलांची अंगझडती घेतली असता एकाच्या कमरेला लपवून ठेवलेला सुमारे १५ इंच लांबीचा धारदार लोखंडी कोयता आढळून आला. तसेच त्यांच्या ताब्यातील काळ्या रंगाची स्प्लेंडर मोटारसायकल जप्त करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत अंदाजे ७० हजार ३०० रुपये आहे. दरम्यान, पुणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत १७मार्च ते ३० मार्च या कालावधीत कोणतेही धारदार शस्त्र बाळगण्यास मनाई आदेश लागू असताना या तिघांनी त्या आदेशाचा भंग केल्याचे समोर आले. त्यामुळे त्यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता, भारतीय हत्यार कायदा तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या संबंधित कलमान्वये फुरसुंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पुण्यातील एफसी रोडवरच तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**पुणे, ता. २९ :** पुण्यातील गजबजलेल्या एफसी रोड परिसरात शनिवारी रात्री घडलेल्या एका धक्कादायक घटनेने नागरिकांना हादरवून सोडले. खाऊगल्लीमध्ये सुमारे ९.१५ वाजण्याच्या सुमारास, नेहमीप्रमाणे गर्दी असताना आदित्य सातपुते (वय ४१) यांनी स्वतःच्या गळ्यावर ब्लेडने वार करत आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार इतक्या अचानक घडला की उपस्थित लोक काही क्षणांसाठी स्तब्ध झाले. मिळालेल्या माहितीनुसार, आदित्य सातपुते हे मूळचे मुंबईतील बोरिवलीचे रहिवासी असून सध्या पुण्यातील भोसले नगरमध्ये राहत होते. काही दिवसांपूर्वी त्यांची नोकरी गेल्याने ते मानसिक तणावाखाली होते. याच नैराश्यातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

घटना घडताच नागरिकांनी तत्परता दाखवत तातडीने मदत केली. जखमी अवस्थेत असलेल्या सातपुते यांना जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांकडून मिळत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेतली. प्राथमिक तपासात नोकरी गमावल्यामुळे आलेल्या मानसिक तणावातून हा प्रकार घडल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, यामागे इतर काही कारणे आहेत का, याचाही तपास सुरू आहे.



## परदेशी विद्यार्थिनीच्या वसतिगृहात घुसून डिलिव्हरी बॉयचे अश्लील वर्तन

**पुणे, ता. २९ :** विद्येचे माहेरघर मानल्या जाणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी घटना समोर आली आहे. शुक्रवारी रात्री एका परदेशी विद्यार्थिनीच्या निवासस्थानी घुसून डिलिव्हरी बॉयने अश्लील वर्तन केल्याचा आरोप झाला असून, त्याहून धक्कादायक म्हणजे ही घटना दडपण्याचा प्रयत्न झाल्याचे आरोपही पुढे आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री उशिरा ऑर्डर देण्याच्या बहाण्याने आलेल्या डिलिव्हरी बॉयने विद्यार्थिनींच्या खोलीसमोर अनुचित हालचाली केल्या. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे घाबरलेल्या विद्यार्थिनींनी तक्रार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना त्वरित पोलिसांकडे नेण्याऐवजी काही संबंधितांनी तक्रार




देऊ नका असा दबाव टाकल्याचा आरोप आहे. विद्यार्थिनींकडून जबरदस्तीने लेखी निवेदन घेतल्याचेही समोर आले असून, हा मुद्दा विद्यापीठाच्या अधिसभेत गाजला.

या घटनेने विद्यापीठातील सुरक्षा यंत्रणेतील त्रुटी उघड केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहाची व्यवस्था असतानाही काही विद्यार्थिनींना प्राध्यापकांच्या निवास इमारतीत ठेवण्यात आले होते. या इमारतीत सीसीटीव्ही कॅमेरे नसणे, सुरक्षा रक्षकांची कमतरता अशा बाबी गंभीर ठरत आहेत. विशेषतः परदेशी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक संवेदनशील असताना अशा प्रकारची निष्काळजीपणा चिंताजनक आहे.

या पार्श्वभूमीवर कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी २ दिवसांत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच अधिकृत पोलिस तक्रार दाखल करण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. ही घटना केवळ एका विद्यार्थिनीपुरती मर्यादित नाही, तर संपूर्ण शैक्षणिक व्यवस्थेतील सुरक्षेच्या निकषांवर प्रश्न उपस्थित करते. विद्यार्थ्यांचा विश्वास टिकवण्यासाठी आणि विशेषतः महिला व परदेशी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी ठोस आणि तातडीचे पाऊल उचलणे आता अत्यावश्यक ठरले आहे.

## सहा राज्यांत धुमाकूळ घालणारा चोरटा अखेर पुणे पोलिसांच्या जाळ्यात

**पुणे, ता. २९ :** सहा राज्यांमध्ये घरफोड्या करत पोलिसांना चकवा देणाऱ्या एका बाइकरला अखेर अटक करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशातील मिर्झापूर येथे पोलिसांनी ही कारवाई केली. मोहम्मद बशार नूर मोहम्मद (वय ३८) उर्फ नेवनाथ विनोद कुमार असे आरोपीचे नाव असून, तो मूळचा बांगलादेशचा असून सध्या तेलंगणा मध्ये राहत होता. देशभरात ५० पेक्षा अधिक घरफोड्या केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

कर्वेनगर परिसरातील द टेरिटरी ऑफिस येथे १४ ते १५ मार्च दरम्यान घरफोडी झाली होती. या घटनेत सुमारे ६ लाख ७१ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेला होता. यात कॅमेरा, लेन्स, ड्रोन, आयफोन आणि इतर महागड्या वस्तूंचा समावेश होता. या प्रकरणी अलंकार पोलिसांनी तपास सुरू केला.




तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी रॉयल एनफिल्ड हिमालयन दुचाकीवर फिरताना दिसला. चोरीतील आयफोनच्या लोकेशनच्या मदतीने पोलिसांनी त्याचा माग काढला. आरोपी सतत राज्य बदलत असल्याचे लक्षात आले. तो हैदराबाद, चंद्रपूर, नागपूर, जबलपूर मार्गे उत्तर प्रदेशात पोहोचल्याचे उघड झाले. पुणे पोलिसांनी इतर राज्यांच्या पोलिसांशी संपर्क साधत सापळा रचला. वाराणसी पोलिसांच्या मदतीने मिर्झापूर येथे आरोपीला पकडण्यात आले. त्याच्याकडून बांगलादेशी पासपोर्ट आणि विविध देशांची चलने जप्त करण्यात आली आहेत.

आरोपी बनावट ओळखपत्रांचा वापर करून वेगवेगळ्या नावांनी गुन्हे करत होता. त्याच्याविरुद्ध आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्येही अनेक गुन्हे दाखल आहेत. पुढील तपास सुरू असून आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

## टाकळकरवाडी फाट्याजवळ झालेल्या अपघातात पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू

**पिंपरी-चिंचवड, ता. २९ :** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील एका कर्तव्यदक्ष जवानाचा भीषण अपघातात मृत्यू झाल्याने खेड तालुक्यासह संपूर्ण पोलीस दल शोकमग्न झाले आहे. शशिकांत श्रीधर होले (वय ३५), महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले कॉन्स्टेबल, यांचा २८ मार्च २०२६ रोजी रात्री झालेल्या अपघातात दुर्दैवी अंत झाला.

घटनेनुसार, रात्री सुमारे १०:३० वाजता होले हे आपल्या ड्युटीवरून बुलेट वरून खेड-पाबळ मार्गे होलेवाडी गावाकडे निघाले होते. त्यांच्या मागोमाग त्यांचे चुलत भाऊही येत होते. टाकळकरवाडी फाट्याजवळ समोरून येणाऱ्या रिक्षाने अचानक यू-टर्न घेतल्याने होले यांच्या दुचाकीची जोरदार धडक बसली. धडक इतकी तीव्र होती की ते रस्त्यावर फेकले गेले. हेल्मेट सुटल्याने डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि




ते घटनास्थळीच बेशुद्ध पडले.

स्थानिकांच्या मदतीने त्यांना तातडीने राजगुरुनगर येथील रुग्णालयात नेण्यात आले, त्यानंतर पुढील उपचारासाठी चाकण येथे हलवण्यात आले. मात्र रात्री सुमारे ११:१२ वाजता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या अपघातामागे बेदरकार वाहनचालकता आणि अचानक घेतलेले वळण हे प्रमुख कारण असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या प्रकरणी रिक्षा चालकाविरोधात तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

हा अपघात केवळ एक वैयक्तिक दुःखद घटना नाही, तर रस्ते सुरक्षेच्या गंभीर प्रश्नाकडेही लक्ष वेधणारा आहे. अचानक यू-टर्न, वाहतुकीचे नियम न पाळणे आणि सुरक्षात्मक साधनांकडे दुर्लक्ष या गोष्टी अजूनही जीवघेण्या ठरत आहेत.

शशिकांत होले हे मनमिळावू आणि जबाबदार अधिकारी म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या अकाली निधनाने कुटुंबासोबतच सहकाऱ्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अशा घटनांमधून धडा घेत, सुरक्षित आणि शिस्तबद्ध वाहनचालना हीच खरी श्रद्धांजली ठरू शकते.

## चैत्री कामदा एकादशीची अनोखी परंपरा, पंढरपुरात विठूरायाला पुरणपोळीचा नैवेद्य

**पंढरपूर, ता. २९ :** चैत्री कामदा एकादशीचा मुख्य सोहळा लाखो वैष्णव भक्तांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा होतो आहे. अवघी पंढरी नगरी हरिनामाच्या जयघोषाने दुमदुमून गेलेली पाहायला मिळते. उन्हाचा असह्य तडाखा बसत असताना देखील वारकऱ्यांच्या भक्तीचा उत्साह काही कमी दिसत नाही. दरम्यान आज एकादशी असली तरी श्री विठ्ठल रखुमाईला फराळाचा नैवैद्य न दाखविता चक्क पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्यात आला आहे तथापि वारकरी भाविक मात्र फराळ करतात.

चैत्री एकादशीच्या नैवेद्याची रंजक अशी पुरातन कथा आहे. तीर्थक्षेत्र शिखर शिंगणापूर येथे श्री महादेव व पार्वतीचा विवाह होता या विवाहाला श्री विठ्ठल रखमाई उपस्थित होते. विवाहानंतर झालेल्या भोजनात श्री विठ्ठल रखुमाई यांनी एकादशी असताना देखील उपवास मोडून





पुरणपोळी खाल्ल्याची आख्यायिका आहे. या संदर्भाने पुराणात याचा उल्लेख आहे हजारो वर्षाची ही परंपरा आजही पंढरपूरच्या श्री विठ्ठल मंदिराकडून जपली जात आहे.

आजच्या या चैत्री वारी एकादशीचे औचित्य साधून दोन लाखाहून अधिक वारकरी भाविकांनी चंद्रभागेचे स्नान व नगरप्रदक्षिणा पूर्ण करुन पिढीजात वारी पूर्ण केली. दरम्यान श्री विठुराया व रुक्मिणीमातेचे पदस्पर्श दर्शन घेण्यासाठी दर्शन रांगेत हजारो भाविक उभे असून ही रांग रिद्धी-सिद्धी पत्राशेडपर्यंत पोहोचली आहे. दर्शन रांगेतील भाविकांसाठी आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा मंदिर समितीमार्फत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विठ्ठल नामाच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला आहे. याशिवाय दर्शन रांगेतील एक ही भाविक उपाशी राहू नये म्हणून पत्रा शेड येथे साबुदाण्याची खिचडी, मिनरल वॉटर, सकाळी चहा, दुपारी लिंबू सरबत व सायंकाळी पुन्हा चहा मोफत वाटप करण्यात येत आहे.

दर्शन रांगेत चांगली स्वच्छता पायाला खडी टोचू नये म्हणून मॅट, शौचालय, दर्शन द्रुत गतीने चालून भाविकांचे जलद व सुलभ दर्शन होण्यासाठी अनुभवी कमांडोची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे दर्शन रांगेतील भाविकांचा प्रवास सुखकर होण्यास मदत होत असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिली.

# रेमंड समूहाचे माजी अध्यक्ष, पद्मभूषण डॉ. विजयपत सिंघानिया यांचे निधन

**मुंबई, ता. २९ :** रेमंड समूहाचे माजी अध्यक्ष, पद्मभूषण पुरस्कार विजेते आणि भारतातील उद्योगविश्वातील दिग्गज व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जाणारे विजयपत सिंघानिया यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले. मुंबईत त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाची माहिती पुत्र आणि रेमंड समूहाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गौतम सिंघानिया यांनी सोशल मीडियावरून दिली. उद्योगजगत, विमानचालन क्षेत्र आणि सामाजिक वर्तुळात त्यांच्या जाण्याने मोठी पोकळी निमर्ण झाली आहे.



विजयपत सिंघानिया हे केवळ यशस्वी उद्योगपती नव्हते, तर त्यांनी भारतीय वस्त्रोद्योगाला जागतिक स्तरावर नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी सुमारे २० वर्षे रेमंड समूहाचे नेतृत्व करत कंपनीला नवी उंची दिली. त्यांच्या कार्यकाळात रेमंड हा ब्रँड केवळ भारतातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय बाजारातही ओळखला जाऊ लागला. वर्ष २००० मध्ये त्यांनी कंपनीची सूत्रे पुढच्या पिढीकडे गौतम सिंघानिया यांच्याकडे सोपवली. विशेष म्हणजे, त्यांनी आपल्या मालकीतील सुमारे ३७% हिस्साही मुलाकडे हस्तांतरित केला होता.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण बाजू म्हणजे विमानचालनाविषयीची त्यांची आवड. ते एक कुशल वैमानिक होते आणि हॉट एअर बलूनद्वारे सर्वाधिक उंची गाठण्याचा जागतिक विक्रम त्यांनी प्रस्थापित केला होता. त्यांच्या या धाडसी कामगिरी मुळे भारताचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकले.

तथापि, त्यांच्या आयुष्यात काही वादळेही आली. कंपनीतील हिस्स्यांवरून व कौटुंबिक मालमत्तेवरून वडील-पुत्रांमध्ये कायदेशीर वाद निर्माण झाले होते. मात्र, नंतर ते प्रश्न सोडवण्यात आले.

विजयपत सिंघानिया यांचे आयुष्य हे उद्योग, साहस आणि नेतृत्व यांचा संगम होते. त्यांच्या निधनाने एक दूरदर्शी नेता हरपला आहे. भारतीय उद्योगविश्वासाठी ही केवळ एका व्यक्तीची हानी नसून, एक प्रेरणादायी युगाचा अंत मानला जात आहे.

# गॅस सिलिंडरच्या रांगेत वृद्धाचा मृत्यू; रोहिणी खडसेंनी महिला आमदाराला फटकारले

**मुंबई, ता. २९ :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जरी राज्यात सिलिंडरचा तुटवडा नसल्याचे जरी सांगत असले तरी अनेक ठिकाणी सिलिंडरसाठी मोठ्याच्या मोठ्या रांगा पाहायला मिळत आहे. या रांगांमध्ये काही जणांचा मृत्यूही झाल्याचे समोर आले आहे. असाच प्रकार अकोल्यातही घडला आहे. अकोल्यातील माजी सरपंच शंकरराव शिरसाट यांना आपला जीव गमवावा लागला. त्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी भाजपच्या महिला आमदारावर जोरदार निशाणा साधला आहे.

जे लोक सांगतात ना की राज्यात मुबलक गॅस सिलिंडर आहेत, त्यांना जरा हा फोटो दाखवा. अकोल्यातील




अन्वी मिर्झापूरचे माजी सरपंच शंकरराव शिरसाट यांना काल यदुराज गॅस एजन्सीसमोर सिलिंडरसाठी रांगेत उभे असताना आपला जीव गमवावा लागला आहे. सिलिंडर बूक करा, २५ दिवसात येईल असं वर तोंड करून सांगणाऱ्या आमदार मॅडमने शिरसाट कुटुंबीयांची सर्वात आधी माफी मागायला हवी, असे रोहिणी खडसे यांनी भाजपच्या आमदार चित्रा वाघ यांना सुनावले आहे. काही दिवसांपूर्वी विधिमंडळ परिसरात काँग्रेस पक्षाचे आमदार आंदोलन करत असताना २५ दिवसांत गॅस सिलिंडर मिळतो, गॅस बूक करा असे विधान भाजप आमदार चित्रा वाघ यांनी केले होते. त्यावरून रोहिणी खडसे यांनी त्यांच्यावरती नाव न घेती टीका केली आहे.

## खरात प्रकरणात आता ईडीची एन्ट्री?

नाशिक, ता. २९ : भोंदूबाबा अशोक खरात यांच्याभोवतीचा चौकशी यंत्रणांचा फास आता आणखी आवळला जाण्याची शक्यता आहे. सध्या अशोक खरात याची विशेष तपास पथकामार्फत चौकशी सुरु आहे. मात्र, आता या प्रकरणात आर्थिक गैरव्यवहारात गुंतलेल्या अनेक राजकारण्यांना धडकी भरवणाऱ्या ईडीची एन्ट्री होण्याची शक्यता आहे. अशोक खरात याने हवाला रॅकेट आणि व्याजाच्या धंद्यात कोट्यवधी रुपयांची उलाढाल केल्याचे आतापर्यंतच्या विशेष तपास पथकाच्या चौकशीतून समोर आले आहे. अशोक खरात हा आर्थिक गैरव्यवहाराचे मोठे रॅकेट चालवायचा असा संशय पोलिसांना आहे. खरात हा त्याच्या संपर्कातील वरिष्ठ अधिकारी, व्यावसायिक, उद्योजक आणि राजकारण्यांचा काळा पैसा जमा करुन तो व्याजाने द्यायचा, अशी शक्यता आहे. याशिवाय, तो हवालामार्फत देश-विदेशात तो शेकडो कोटींची हेराफेरी करत आल्याची माहिती समोर आली आहे.

# महाराष्ट्रात दुपारचे ४९ अंश तापमान अन् रात्री वादळी पाऊस

**पुणे, ता. २९ :** महाराष्ट्रात मार्चअखेर हवामानाने पुन्हा एकदा अनिश्चिततेचा कळस गाठला आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेले वादळी वातावरण, अधूनमधून पडणारा पाऊस आणि वाढती उष्णता यामुळे राज्यभर अस्मानी संकट अधिक गडद होत आहे. हवामान विभागाने पुढील २४ तासांत वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि काही भागांत गारपिटीचा इशारा दिला आहे, ज्यामुळे नागरिक आणि शेतकऱ्यांसाठी सतर्क राहणं अत्यावश्यक ठरलं आहे.



आज राज्यात कोरड्या ते अंशतः ढगाळ हवामानाची स्थिती राहील. काही ठिकाणी ३० ते ४० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून हलक्या पावसाचीही शक्यता आहे. कमाल तापमान ३१ ते ३९ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २५ ते २८ अंश दरम्यान राहणार आहे. सांगली, सोलापूर, लातूर आणि धाराशिव या ४ जिल्ह्यांना वादळी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

कोकणात उष्ण आणि दमट हवामानाचा प्रभाव कायम असून, मुंबईसह किनारपट्टी भागात तापमान ३१ ते ३२ अंशांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. पुढील २ दिवसांत दक्षिण कोकणात वादळी पावसाची शक्यता वाढणार आहे. मध्य महाराष्ट्रात आज तुलनेने शांतता दिसत असली, तरी ही वादळापूर्वीची शांतता असल्याचे संकेत आहेत. सोमवारपासून वाऱ्यांचा वेग ४० ते ५० किमी प्रतितास पर्यंत वाढून बहुतांश भागांना पावसाचा तडाखा बसण्याची शक्यता आहे.

मराठवाड्यात सध्या तापमान ३४ ते ३७ अंशांदरम्यान आहे. आज काही जिल्ह्यांत हवामान कोरडे राहील, पण ३० मार्चपासून संपूर्ण भागात अवकाळी पाऊस सक्रिय होईल. विदर्भातही तापमान ३६ ते ३९ अंशांपर्यंत वाढत असून, पुढील २ दिवसांत वादळी पावसाचा धोका आहे.

या परिस्थितीमागे बदलते दाबमान, उष्णतेची लाट आणि पश्चिमेकडून येणाऱ्या वाऱ्यांचा प्रभाव कारणीभूत आहे. याचा सर्वाधिक फटका शेतीला बसत असून, काढणीला आलेली पिके धोक्यात आली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकांचे संरक्षण, तर नागरिकांनी विजेपासून आणि वादळी वाऱ्यांपासून सावध राहणे गरजेचे आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गजानन पाटील यांना सर्वोत्तम मुख्य कार्यकारी अधिकारी पुरस्कार

**पुणे, ता. २९ :** मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा आणि सेवाकर्मी कार्यक्रमात पुणे जिल्हा परिषदेच्या कामगिरीला राज्यपातळीवर मोठा सन्मान मिळाला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांना सर्वोत्तम जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून गौरवण्यात आले.

या सन्मानामुळे पुणे जिल्हा परिषदेने प्रशासनातील कार्यक्षमता, पारदर्शकता आणि नागरिकाभिमुख सेवा देण्याच्या दिशेने केलेल्या प्रयत्नांची दखल घेतली गेली आहे. ई-गव्हर्नन्स उपक्रमांतर्गत डिजिटल सेवा, ऑनलाइन प्रणाली, जलद



निर्णयप्रक्रिया आणि नागरिकांना सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला होता. या निकषांवर पुणे जिल्हा परिषद आघाडीवर ठरली.

या यशाबद्दल राज्याच्या उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी गजानन पाटील यांचे विशेष अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, प्रशासन अधिक सक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख बनवण्यात अशा उपक्रमांची मोठी भूमिका आहे. तसेच या उपक्रमांत पुरस्कार प्राप्त केलेल्या सर्व अधिकारी आणि कार्यालयांचेही त्यांनी कौतुक केले.

पुणे जिल्ह्याच्या विकासात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे योगदान महत्त्वाचे राहिले असल्याचा उल्लेखही यावेळी करण्यात आला. त्यांच्या कार्यपद्धती आणि विकासाभिमुख दृष्टिकोनामुळेच जिल्हा परिषदेच्या कामकाजाला दिशा मिळाल्याचे नमूद करण्यात आले.

या सन्मानामुळे केवळ एका अधिकाऱ्याचा गौरव न होता, संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेच्या कामगिरीची नोंद घेतली गेली आहे. डिजिटल प्रशासनाच्या माध्यमातून नागरिकांना अधिक जलद, पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा देण्याच्या दिशेने पुणे जिल्हा परिषद पुढे जात असल्याचे या पुरस्कारातून स्पष्ट झाले आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



# चष्म्याचा नंबर वाढतोय?; डोळ्यांची ताकद वाढवण्यासाठी आहारात आजच समाविष्ट करा या ५ गोष्टी

आजच्या डिजिटल युगात मोबाईल, लॅपटॉप आणि टीव्हीसमोर घालवला जाणारा वेळ मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे अनेकांना डोळ्यांच्या समस्या जाणवू लागल्या आहेत. डोळे दुखणे, धुसर दिसणे, कोरडेपणा आणि चष्म्याचा नंबर वाढणे या तक्रारी आता सर्वसामान्य झाल्या आहेत. मात्र डोळ्यांचे आरोग्य टिकवण्यासाठी केवळ चष्मा किंवा कॉन्टॅक्ट लेन्स वापरणे पुरेसे नसते. योग्य आणि पोषणयुक्त आहार घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक मानले जातात. हे घटक डोळ्यांच्या पेशींना मजबूत ठेवतात आणि अनेक आजारांपासून संरक्षण देतात. त्यामुळे रोजच्या आहारात काही आरोग्यदायी पदार्थांचा समावेश करणे गरजेचे आहे.

१) गाजर : डोळ्यांसाठी गाजर हा सर्वात उपयुक्त पदार्थ मानला जातो. गाजरात बीटा-कॅरोटीन मोठ्या प्रमाणात असते. हे शरीरात जाऊन व्हिटॅमिन एमध्ये बदलते. व्हिटॅमिन ए डोळ्यांची दृष्टी सुधारण्यास मदत करते. विशेषतः रात्री स्पष्ट दिसण्यासाठी हे खूप फायदेशीर ठरते. तसेच डोळ्यांना संसर्ग होण्याचा धोका देखील कमी होतो.

२) हिरव्या पालेभाज्या : पालक, मेथी, कोथिंबीर किंवा ब्रोकोलीसारख्या हिरव्या पालेभाज्यांमध्ये ल्यूटिन आणि झेक्सँथिन नावाचे शक्तिशाली अँटिऑक्सिडंट्स असतात. हे घटक डोळ्यांच्या रेटिनाचे संरक्षण करतात. तसेच सूर्याच्या हानिकारक किरणांपासून डोळ्यांचे रक्षण करण्यातही मदत करतात. वाढत्या वयानुसार होणाऱ्या काही डोळ्यांच्या आजारांचा धोका देखील कमी होतो.

३) बदाम : बदामामध्ये व्हिटॅमिन ई मोठ्या प्रमाणात असते. हे डोळ्यांच्या पेशींना होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण देते. रोज ते भिजवलेले बदाम खाल्ल्यास डोळ्यांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. तसेच शरीरालाही आवश्यक ऊर्जा मिळते.

४) आंबट फळे : आवळा, संत्रे आणि लिंबू यांसारख्या आंबट फळांमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. व्हिटॅमिन सी डोळ्यांच्या आसपासच्या रक्तवाहिन्या मजबूत करण्यास मदत करते. त्यामुळे डोळ्यांमध्ये रक्ताभिसरण सुधारते. यामुळे मोतीबिंदूसारख्या आजारांचा धोका कमी होऊ शकतो.

५) ओमेगा-३ असलेले पदार्थ : मासे, अक्रोड आणि अळशीचे बी हे ओमेगा- फॅटी ॲसिडचे उत्तम स्रोत आहेत. हे घटक डोळ्यां मधील कोरडेपणा कमी करतात आणि दृष्टी स्पष्ट ठेवण्यास मदत करतात. विशेषतः ज्यांचा स्क्रीन टाइम जास्त असतो त्यांच्यासाठी हे पदार्थ खूप उपयुक्त ठरतात.

# नाशिकफाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या निविदा प्रक्रियेला गती

पिंपरी-चिंचवड, ता. २९ : पिंपरी-चिंचवड ते राजगुरूनगर खेड दरम्यान गेल्या अनेक वर्षांपासून नागरिक, कामगार आणि उद्योजक त्रस्त असलेल्या भीषण वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी नियोजित नाशिक 'ाटा ते खेड या ३० किमी लांबीच्या ८ पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्पाने महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. मार्च २०२६ मध्ये या प्रकल्पासाठी तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असून, या प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेला आता गती मिळाली आहे.

हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण मा'त राबवण्यात येत असून, यासाठी सुमारे ७ हजार ८२७ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. तांत्रिक निविदा




प्रक्रियेत अदानी इंटरप्राईजेस लि., जीआर इन्'ा प्रोजेक्ट्स लि. आणि प्रकाश एस'ालटिंग अँड टोल हायवेज इंडिया लि. यांसारख्या देशातील आघाडीच्या पायाभूत सुविधा निर्माण करणाऱ्या कंपन्यांनी सहभाग नोंदवला आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या दर्जाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

**आमदार महेश लांडगे यांचा सकारात्मक पाठपुरावा...**

भाजपाचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी या प्रकल्पासाठी सातत्याने केंद्र व राज्य शासनाकडे पाठपुरावा केला होता. विशेषतः भोसरी ते मोशी इंद्रायणी नदी दरम्यानच्या भू-संपादनातील अडचणी, ए'एसआय/टीडीआरच्या माध्यमातून जमीन उपलब्ध करून देण्यातील अडथळे, तसेच निधीबाबतचे प्रश्न त्यांनी वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणले.

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये...**

या प्रकल्पांतर्गत सिंगल पिलरवर उभारण्यात येणारा ८ पदरी एलिव्हेटेड फ्लायओव्हर, विद्यमान महामार्गाचे ४/६ पदरी रुंदीकरण, एकूण ३० किमी लांबी, तसेच स्वतंत्र सर्व्हिस रोडची उभारणी करण्यात येणार आहे. यामुळे स्थानिक वाहतूक आणि लांब पल्ल्याच्या वाहनांसाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण होणार आहे.

**उद्योजक व नागरिकांना मोठा दिलासा**

हा कॉरिडॉर पूर्ण झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड, भोसरी आणि चाकणसारख्या प्रमुख औद्योगिक केंद्रांना खेडमार्गे वेगवान व सुरक्षित कनेक्टिव्हिटी मिळणार आहे.

सध्या पुणेनाशिक महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी, अपघात आणि वेळेचा अपव्यय मोठ्या प्रमाणात कमी होणार असून, औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे.

> नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर हा पिंपरी-चिंचवड, भोसरी, मोशी, चाकण आणि खेड परिसरातील लाखो नागरिक, काम गार आणि उद्योजकांसाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असून त्याच्या निविदा प्रक्रियेला मिळालेली गती समाधानकारक आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांच्या नेतृत्वात आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली या महत्वाकांक्षी प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत आम्ही सर्वतोपरी पाठपुरावा करणार आहोत.
>
> - **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे

# आता घराघरांत येणार गॅसची पाईपलाईन?

**पुणे, ता. २९ :** आखाती देशांतील युद्धजन्य तणावाचा थेट परिणाम भारतातील इंधन पुरवठ्यावर होत असून, महाराष्ट्रात एलपीजी गॅसच्या तुटवड्याची परिस्थिती गंभीर होत चालली आहे. इराण आणि इस्रायलमधील वाढत्या संघर्षामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतून होणाऱ्या इंधन वाहतुकीवर परिणाम झाला आहे. भारत मोठ्या प्रमाणावर एलपीजीसाठी आयातीवर अवलंबून असल्याने या अडथळ्याचा फटका राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना बसताना दिसत आहे.



अनेक शहरांमध्ये गॅस सिलिंडरसाठी लांबच लांब रांगा लागल्या असून, भविष्यात गॅस उपलब्ध होईल की नाही या भीतीमुळे काही नागरिक अतिरिक्त साठा करण्याकडे वळले आहेत. यामुळे तुटवड्याची समस्या आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर राज्य सरकार मोठा धोरणात्मक निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. पाणी आणि वीज कनेक्शनप्रमाणेच आता घराघरात पीएनजी म्हणजेच पाइपलाइनद्वारे गॅस पुरवठा अनिवार्य करण्याचा विचार सुरू आहे. आजच या संदर्भातील निर्णय जाहीर होण्याची शक्यता असून, रात्री उशिरापर्यंत याबाबत अधिकृत घोषणा होऊ शकते.

पीएनजी गॅस हा एलपीजीपेक्षा तुलनेने स्वस्त, सुरक्षित आणि सातत्याने उपलब्ध राहणारा पर्याय मानला जातो. विशेषतः शहरी भागात पाइपलाइन नेटवर्क उभारल्यास सिलिंडरवर अवलंबित्व कमी होऊन तुटवड्याच्या परिस्थितीतही नागरिकांना गॅसचा अखंड पुरवठा शक्य होऊ शकतो.

तज्ज्ञांच्या मते, हा निर्णय केवळ सध्याच्या संकटावर उपाय म्हणून नव्हे, तर दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरू शकतो. मात्र, ग्रामीण आणि दुर्गम भागात पीएनजी सुविधा पोहोचवणे हे मोठे आव्हान असणार आहे.

सध्याच्या परिस्थितीत नागरिकांनी घाबरून अतिरिक्त साठा न करता उपलब्ध साधनांचा संयमाने वापर करणे गरजेचे आहे. तसेच, सरकारकडून येणाऱ्या नव्या धोरणांनुसार पर्यायी ऊर्जा स्रोतांचा स्वीकार करण्यासाठी तयारी ठेवणेही तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे.

# स्वारगेट–बारामती मार्गावर राजमाता जिजाऊ शटल बस सेवेचा शुभारंभ

**पुणे, ता. २९ :** राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या सुरक्षिततेला आणि सोयीला लक्षात घेऊन राजमाता जिजाऊ ही नवी शटल बस सेवा पुण्यात सुरू केली आहे. बुधवारी २५ तारखेला ही बस पुण्यात दाखल झाली असून स्वारगेट ते बारामती या मार्गावर सेवा सुरू करण्यात आली आहे. पुणे शहरासाठी आलेली ही राज्यातील पहिली बस असल्याची माहिती विभागीय वाहतूक अधिकारी कमलेश धनराळे यांनी दिली.

या बसमध्ये एकूण ५६ आसन क्षमता असून सध्याच्या बसेसपेक्षा १६ आसने जास्त आहेत. त्यामुळे प्रवाशांना अधिक आरामदायी प्रवास करता येणार आहे. ही बस विनावातानुकूलित असून दोन शहरांदरम्यान जास्त गर्दी असलेल्या मार्गांवर शटल सेवेसाठी चालवली जाणार आहे. त्यामुळे प्रवासाचा वेळ कमी होईल आणि वाहतुकीवरील ताणही कमी होण्यास मदत होईल.

नव्या बसमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेसाठी विशेष सुविधा देण्यात आल्या आहेत. बसमध्ये एकूण ५ सीसीटीव्ही कॅमेरे, जीपीएस यंत्रणा, पॅनिक बटन, पब्लिक अनाउन्समेंट सिस्टीम आणि इलेक्ट्रॉनिक मार्ग फलक यांचा समावेश आहे. त्यामुळे प्रवास अधिक सुरक्षित आणि सोपा होणार आहे.

पुणे विभागात पुढील २ महिन्यांत सुमारे २५० बसेस टप्प्याटप्प्याने दाखल होणार असल्याचेही सांगण्यात आले आहे. या नव्या बस सेवेचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# पवार कुटुंबातील दरी मिटणार का?; विलीनीकरणासाठी सुनेत्रा पवारांशी चर्चेची तयारी

## राष्ट्रवादीच्या वर्तुळात हालचालींना वेग

**पुणे, ता. २९ :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील विलीनीकरणाच्या चर्चेला सध्या ब्रेक लागल्याचे चित्र दिसत असले, तरी पडद्यामागे हालचाली सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. गेल्या काही दिवसांत आमदार रोहित पवार यांनी राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर थेट आरोप करत आक्रमक भूमिका घेतली. त्यामुळे दोन्ही गटांमधील दरी अधिकच वाढल्याचे दिसत आहे.

तरीही, पक्षाच्या तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये आणि काही ज्येष्ठ नेत्यांमध्ये दोन्ही गटांनी एकत्र यावे, अशी भावना कायम आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, विलिनीकरणाचा मार्ग पूर्णपणे बंद झालेला नसून, त्यासाठी सुनेत्रा पवार यांच्याशी थेट चर्चा होणे महत्त्वाचे ठरू शकते. त्या निर्णयक्षम



नेतृत्व म्हणून पुढे येऊ शकतात, अशीही चर्चा सुरू आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाला आज २ महिने पूर्ण होत आहेत. या निमित्ताने पक्षात त्यांच्या आठवणींना उजाळा देताना, दोन्ही गटांच्या एकत्र येण्याचा मुद्दा पुन्हा पुढे आला आहे. मात्र, त्यांच्या निधनानंतर राजकीय समीकरणे बदलली असून, कुटुंब आणि पक्ष यांच्यातील समतोल ढासळल्याची भावना काही नेत्यांमध्ये आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर लगेचच झालेल्या सत्तास्थापनेच्या घडामोडींमध्ये घाईगडबडीत निर्णय झाल्याची टीका झाली होती. विशेषतः सुनेत्रा पवार यांनी चौथ्याच दिवशी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्याने राजकीय वाद निर्माण झाला. या प्रक्रियेबाबत माहिती नव्हती, असे शरद पवार यांनी त्यावेळी स्पष्ट केले होते. दरम्यान, या सगळ्या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सध्या दोन वेगळे प्रवाह दिसत आहेत. एकीकडे आरोप-प्रत्यारोप आणि दुसरीकडे एकत्र येण्याची आशा. पुढील काही दिवसांत नेतृत्व पातळीवर संवाद झाला, तर विलिनीकरणाच्या चर्चेला पुन्हा गती मिळू शकते. मात्र सध्यातरी राजकीय वास्तव हे मतभेदांच्या छायेतच दिसत आहे.

# ई–गव्हर्नन्समध्ये पुणे ग्रामीण पोलिसांचा डंका

**पुणे, ता. २९ :** पुणे ग्रामीण पोलीस दलाने ई-गव्हर्नन्सच्या क्षेत्रात केलेल्या कामगिरीची राज्यपातळीवर दखल घेतली गेली असून, या यशामुळे पोलीस प्रशासनातील तंत्रज्ञानाधारित बदलांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत झालेल्या मूल्यमापनात पुणे ग्रामीण पोलीस दलाने २०० पैकी १४५ गुण मिळवत राज्यात चौथा क्रमांक पटकावला, तर कोल्हापूर परिक्षेत्रात प्रथम स्थान मिळवले.

मुंबईतील सह्याद्री सभागृहात झालेल्या समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांचा सन्मान करण्यात आला. या मूल्यमापनात पोलीस विभागातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि नागरिकाभिमुख सेवांचा विशेष आढावा घेण्यात आला होता.



पुणे ग्रामीण पोलीस दलाने विविध डिजिटल उपक्रम प्रभावीपणे राबवले आहेत. सीसीटीएनएस प्रणालीमुळे गुन्हा नोंदणीपासून तपासाच्या प्रगतीपर्यंत सर्व माहिती एकाच प्लॅटफॉर्मवर उपलब्ध झाली असून, पोलीस ठाण्यांमध्ये रिअल-टाइम डेटा शेअरिंग शक्य झाले आहे. आपले सरकार पोर्टलद्वारे नागरिकांसाठी १७ सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, ज्यामुळे घरबसल्या अर्ज आणि प्रमाणपत्रे मिळवणे सुलभ झाले आहे.

तक्रार निवारणासाठी आपले सरकार ग्रीव्हन्स प्रणालीद्वारे १४ दिवसांच्या आत अर्जांचा निपटारा केला जात आहे. ई-ऑफिसमुळे कागदविरहित प्रशासनाला चालना मिळाली असून, कार्यालयीन कामकाजात गती आणि पारदर्शकता वाढली आहे. याशिवाय, व्हॉट्सॲप चॅटबॉटद्वारे २४७ सेवा उपलब्ध करून देत नागरिकांशी संवाद अधिक सुलभ करण्यात आला आहे.

जिआयएस तंत्रज्ञानाद्वारे रात्रगस्तीचे अचूक निरीक्षण, तसेच डाईल ११२ सेवेद्वारे आपत्कालीन प्रतिसादाची वेळ कमी करण्यात आली आहे. पोलीस पॅड प्रणालीमुळे मोठ्या सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये मनुष्यबळाचे नियोजन अधिक प्रभावी झाले असून, भीमा-कोरेगाव आणि संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासारखे मोठे बंदोबस्त सुरळीत पार पडले.

दरम्यान, या उपक्रमांमुळे केवळ पोलीस कामकाज सुलभ झाले नाही, तर नागरिकांचा विश्वासही वाढला आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने अधिक पारदर्शक, जलद आणि जबाबदार पोलीस व्यवस्था उभारण्याच्या दिशेने हे पाऊल महत्त्वाचे मानले जात आहे.

# स्वयंघोषित धर्मगुरू ऋषिकेश वैद्यला ९ दिवसांची पोलीस कोठडी

**पुणे, ता. २९ :** पुण्यातील स्वयंघोषित धर्मगुरू ऋषिकेश वैद्य याला महिलेच्या लैंगिक शोषणाच्या आरोपप्रकरणी न्यायालयाने ९ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. मात्र या सुनावणीदरम्यान आरोपीच्या वकिलांनी कोर्टात मांडलेली बाजू विशेष चर्चेत आली आहे.

सरकारी बाजूने आरोपीविरोधात गंभीर आरोप मांडत तपासासाठी १४ दिवसांची कोठडी मागितली होती. आरोपीचा मोबाईल, चॅटिंग, फोटो आणि व्हिडीओ यांचा तपास अत्यंत महत्त्वाचा असल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच आरोपीने इतर महिलांनाही अशाच प्रकारे फसवले आहे का, याचाही शोध घेण्याची गरज असल्याचे नमूद करण्यात आले.

मात्र बचाव पक्षाने याला ठाम विरोध करत फिर्यादी महिलेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आरोपीच्या वकिलांच्या मते, संबंधित महिलेने



स्वतःहून फेसबुकवरून ऋषिकेश वैद्यला फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली होती आणि त्यानंतर दोघांमध्ये संवाद सुरू झाला. महिला विवाहित असूनसुद्धा स्वतःच्या इच्छेने त्याच्यासोबत लॉजवर गेली होती, असा दावा त्यांनी केला.

याशिवाय, कथित घटनेच्या संदर्भात लॉजवर गेल्याचा उल्लेख तक्रारीत असल्यास, त्या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासावे, अशी मागणीही बचाव पक्षाने केली. महिला विवाहित असून ती स्वतःच्या संमतीने आरोपीसोबत गेली होती, असेही वकिलांनी स्पष्ट केले.

गुंगीचे औषध देऊन अत्याचार केल्याचा आरोप फेटाळत, आरोपीला खोट्या गुन्ह्यात अडकवण्यात आले असल्याचा दावा बचाव पक्षाने केला. आरोपीची धार्मिक पार्श्वभूमी चांगली असून त्याच्याविरोधातील आरोप हेतुपुरस्सर असल्याचेही त्यांनी सांगितले.

या सर्व मुद्द्यांवरून न्यायालयाने दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर ९ दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली आहे. दरम्यान, या प्रकरणात सत्य काय आहे, हे तपासातूनच स्पष्ट होणार असून, पोलिसांकडून डिजिटल पुरावे आणि इतर बाबींची सखोल चौकशी सुरू आहे.

# खामगावमध्ये सुमारे ५ लाखांचा गांजा जप्त, एकाला अटक

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. २९ : यवत पोलिसांनी अंमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करत खामगाव येथून तब्बल ४ लाख ८७ हजार ९०० रुपये किमतीचा गांजा जप्त केला असून या प्रकरणात एका आरोपीला अटक करण्यात आली आहे, तर दुसरा आरोपी फरार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, यवत पोलिस स्टेशन हद्दीतील खामगाव येथील पाण्याच्या टाकीजवळील पत्र्याच्या शेडमध्ये अवैधरित्या गांजा साठवून विक्री केली जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तात्काळ छापा टाकला.

छाप्यामध्ये आकाश अशोक मोहिते (वय २३, रा. खामगाव) हा संशयास्पद अवस्थेत आढळून आला. त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडून व शेडमधून ८ किलोपेक्षा जास्त वजनाचा गांजा हस्तगत करण्यात आला. जप्त केलेल्या अंमली पदार्थाची किंमत ४ लाख ८७ हजार ९०० इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

चौकशीत आरोपी आकाश मोहिते याने हा गांजा सागर उत्तम चव्हाण (रा. खामगाव, ता. दौंड) याचा असून त्याच्या सांगण्यावरून विक्री करत असल्याची कबुली दिली.

यावरून पोलिसांनी दोघांविरुद्ध एन.डी.पी.एस. कायदा व बी.एन.एस. २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी आकाश मोहिते याला अटक करून न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला ३१ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, फरार आरोपी सागर चव्हाण याचा शोध सुरू असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विजय कोल्हे करीत आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय कोल्हे, अक्षय मोरे, पोलीस हवालदार गुरुनाथ गायकवाड, संदीप देवकर, गणेश कुतवळ, दत्ता काळे, हिरालाल खोमणे तसेच अंमली पदार्थ विरोधी पथक, कोल्हापूर परीक्षेत्र यांच्या संयुक्त पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

